# बृहन्मुंबई महानगरपालिका
## घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

# <u>सूचना</u>

विषय: पी/दक्षिण विभागात 'रस्ते स्वच्छता योजना' राबविण्याबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की **दि. 01 एप्रिल, 2026 ते दि. 31 ऑगस्ट, 2026** या पुढील **05 महिन्याच्या** कालावधीकरीता 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन **दि. 02 एप्रिल, 2026 ते दि. 31 ऑगस्ट, 2026** कालावधीसाठी रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत साफसफाईच्या कामाकरीता वरील विषयांस नमूद करण्यात आलेल्या योजनांतर्गत कामगार / स्वयंसेवक पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या दि. 18 मार्च, 2026 ते 25 मार्च, 2026 पर्यंत सकाळी 11:00 ते दुपारी 04:00 वाजेपर्यंत घेऊ शकता. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 3630/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात दि. 27 मार्च, 2026 दुपारी 02:00 वाजेपर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी 02 संस्थांची दि. 30 मार्च, 2026 रोजी दुपारी 12:00 वाजता **सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या अध्यक्षांस / सचिवास / खजिनदार पैकी कोणत्याही एकास त्यांच्या ओळखपत्रासहीत उपस्थित रहाणे **बंधनकारक** असेल. सोडतीबाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

सही/- 18/03/2026

**सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण**